सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २०६ | शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. साहेबराव धोंडू पाटील
माजी आमदार, अमळनेर





अमळनेर : हिंगोणे व फाफोरे गावांमध्ये ठिकठिकाणी वाळूचे ढिगारे मांडून ठेवण्यात आलेले आहे.

## दिनविशेष
१८ एप्रिल

- शाहू छत्रपती यांच्याकडून पहिले बाजीराव पेशवे यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली.
- मुंबई ते ठाणे नियमित रेल्वे सेवा सुरू झाली.
- जुलमी प्लेग अधिकारी रँड याचा खून करणारे दामोदर चापेकर यांना फाशी.
- क्रांतिकारकांनी चितगाव येथील शस्त्रागार लुटला.
- पेशव्यांची राजधानी पुण्यातील शनिवारवाडा पुरातत्व विभागाच्या ताब्यात देण्यात आला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# बोरी नदीपात्रावर वाळू माफियांचे साम्राज्य

## रात्री उत्खन दिवसा वाहतूक, महसूल विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : तालुक्यातील हिंगोणे ते फाफोरे शिवारात वाळू माफियांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून, बोरी नदीच्या पात्राची उघड लूट सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मध्यरात्रीच्या अंधारात सुरू असलेल्या या अवैध कारवायांकडे महसूल विभाग जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना तीव्र होत आहे.**

दररोज रात्री उशिरा जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या सहाय्याने बोरी नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा केला जातो. काही ठिकाणी तर एकाच रात्री डझनभर ट्रॅक्टरची आवक-जावक होत असते. कोणतीही भीती न बाळगता माफिया टोळ्या खुलेआम नदीचा ऱ्हास करत आहेत.

चोरी केलेली वाळू लगेचच हिंगोणेफाफोरे परिसरातील शेतांमध्ये साठवली जात आहे, जिथून पुढे तिची विक्री केली जाते.या संपूर्ण रॅकेटचा केंद्रबिंदू खळेश्वर मंदिर परिसर ठरत असून, मंदिराच्या मागील बाजूस वाळूचे प्रचंड ढीग उघड्यावर रचलेले दिसत आहेत.येथे दिवसरात्र वाहनांची वर्दळ सुरू असून, जणू काही अधिकृत वाळू डेपोच उभारला आहे की काय, असा प्रश्न निर्माण होत आहे.




धार्मिक स्थळाच्या परिसरातच हा बेकायदेशीर धंदा सुरू असल्याने ग्रामस्थांच्या भावना दुखावल्या जात आहेत.फक्त रात्रीच नव्हे तर दिवसा देखील लहान टेम्पोच्या साह्याने वाळूची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत आहे. फाफोरे, कन्हेरे, रूपजी नगर, मंगरूळ, शिरूड, जानवे, कावपिंप्री यांसह पुढील अनेक गावांमध्ये ही वाळू पोहोचवली जात असल्याची माहिती पुढे आली आहे. बांधकामासाठी स्वस्त दरात वाळू पुरवली जात असल्याने या अवैध धंद्याला मागणीही वाढत असल्याचे दिसते.अमळनेर शहरात तीन चाकी, अनेकदा विना नंबर असलेले टेम्पो गल्लीबोळातून सर्रास फिरताना दिसत आहेत. वाहतूक नियमांची पायमल्ली करत हे वाहनचालक दिवसा ढवळ्या वाळूची ने-आण करत असून, यामुळे कायद्याची भीतीच उरली नसल्याचे स्पष्ट होत आहे. नागरिकांनी अनेक वेळा प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असला तरी परिस्थितीत कोणताही बदल दिसत नाही.इतक्या मोठ्या प्रमाणावर

> **याबाबत शहरातील व ग्रामीण भागातील तक्रारी आलेल्या आहेत.अक्षय तृतीया सण आणि मनुष्यबळाची कमतरता जाणवत आहे. तरी देखील याबाबत कारवाईसाठी पथक नियुक्त केले आहे.**
>
> **रुपेशकुमार सुराणा**
> तहसीलदार, अमळनेर

सुरू असलेल्या अवैध साठ्यांवर महसूल प्रशासनाचे अधिकारी अद्यापही मौन बाळगून आहेत. हे केवळ दुर्लक्ष नसून संगनमत आहे का? असा थेट सवाल आता ग्रामस्थ विचारू लागले आहेत. काही ठिकाणी कारवाईचा केवळ दिखावा केला जातो, मात्र प्रत्यक्षात माफियांवर कोणतीही कठोर कारवाई होत नसल्याचे आरोप आहेत.अवैध वाळू उपशामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. त्याहून गंभीर बाब म्हणजे नदीपात्र खोल होत असून, पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बिघडत आहे.

यामुळे भूजलपातळी कमी होणे, शेतीवर परिणाम होणे तसेच भविष्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढत आहे. पर्यावरणप्रेमींकडूनही या प्रकारावर तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.स्थानिक नागरिकांनी आता प्रशासनाला थेट इशारा दिला असून, तात्काळ पंचनामा करून संबंधित शेतमालक, वाहनचालक आणि वाळू माफियांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# ॲड. ललिता पाटील स्कूलच्या सीबीएसईचा १०० टक्के निकाल

### अक्षरा भामरे अमळनेर- पारोळा विभागात प्रथम तर जिल्ह्यात पाचवी



अक्षरा भामरे



पलक पाटील



मोहित पवार



नैतिक सैनानी



वैष्णवी माळी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : ॲड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूलचा सीबीएसई बोर्डाचा इयत्ता दहावीचा २०२५-२६ निकाल १०० टक्के लागला.माध्यमिक विभागातून अक्षरा भामरे हिने ९८.२० टक्के मिळवत सीबीएसई बोर्डाच्या परिक्षेत अमळनेर-पारोळा विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यासह इयत्ता दहावीच्या निकालात नेत्रदीपक यश संपादन केले.

पलक पाटील ९६.४० टक्के मोहित पवार ९५.२० टक्के नैतिक सेनानी ९५.२० टक्के व वैष्णवी माळी ९४.४० टक्के मिळवत प्रथम पाच मध्ये येण्याचा मान पटकावला आहे. अक्षरा हिने इंग्लिश आणि माहिती तंत्रज्ञानात १०० पैकी १०० तर पलक पाटील हिने मराठीत १०० पैकी १०० गुण मिळवले. यावर्षी देखील सीबीएसई माध्यमिक विभागात शाळेने पंचक्रोशीत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली असून इयत्ता दहावीच्या निकालात नेत्रदीपक गुण मिळवुन घवघवीत यश संपादन केले. परीक्षेत एकूण १०५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. विद्यार्थ्यांच्या यशात सर्व विषय शिक्षकांसह इतर सर्व शिक्षकांनी देखील मेहनत घेतली असून विद्यार्थ्यांच्या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा ॲड.ललिता पाटील, सचिव प्रा.श्याम पाटील, संचालक पराग पाटील व प्रा देवेश्री आणि प्राचार्य डॉ.नीरज चव्हाण यांनी कौतुक व अभिनंदन केले.

# डॉ. विकास दिव्यकीर्तिंनी सुचवलेले ‘हे’ ४ चित्रपट पहा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डॉ. विकास दिव्यकीर्ति सर (दृष्टी आयएएस) हे केवळ यूपीएससी मार्गदर्शक नाहीत, तर जीवन, समाज, नातेसंबंध आणि मानवी मूल्यांवर गहन विचार मांडणारे विचारवंत आहेत.

**निवडक चित्रपट :** डॉ. विकास दिव्यकीर्ति सर यांनी अनेकदा सांगितले आहे, की काही निवडक चित्रपट केवळ मनोरंजन नसून ते आपल्या दृष्टिकोनात, समजुतीत आणि जीवनशैलीत खोलवर बदल घडवू शकतात.

**चार चित्रपट नक्की पाहा :** त्यांचे आवडते हे चार चित्रपट एकदा तरी नक्की पाहा. जे आपणास विचार करण्यास, समजून घेण्यास आणि अधिक चांगले माणूस होण्यास प्रेरित करतील.

**लंचबॉक्स :** दैनंदिन एकटेपण आणि छोट्या-छोट्या आशा-नात्यांमधील सौंदर्य शिकवणारी भावनिक ड्रामा.

**एकलव्य : द रॉयल गार्ड :** निष्ठा, कर्तव्य आणि गुरू-शिष्य संबंधांच्या गहनतेचा शक्तिशाली चित्रण करणारा ॲक्शन-ड्रामा.

**गुलाल :** राजकारण, सत्ता आणि समाजातील द्वंद्व दाखविणारी तीव्र राजकीय ड्रामा, जागरूकता वाढविते.

**बागबान :** कुटुंब, वृद्धत्व आणि पालक-मुलांच्या नात्यांतील मूल्ये समजावून सांगणारी भावुक कथा.

### भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ

# अक्षय्य तृतीयेला मासिक जनजागर सांगता सोहळा

### समाजातील विविध क्षेत्रांतील महानुभवांची लाभणार उपस्थिती

माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः
भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान

श्री मंगलग्रह मंदिर
अमळनेर



**ग्लोबल महादेश वृत्तसेवा**

अमळनेर : अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळीचा प्रारंभ गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंहजी चौहान यांच्या शुभ हस्ते व विविध मंत्री महोदय आणि शेतकऱ्यांच्या उपस्थितीत झाला आहे. त्यानंतर हे अभियान गावपाड्यांसह संपूर्ण देशात राबविण्याचा संकल्प करण्यात आला. त्यानुसार दररोज या अभियानाचा जनजागर अमळनेर तालुक्यातील १५६ गावांमध्ये करण्याचे सुनिश्चित करण्यात आले. त्याप्रमाणे रोज नित्यनियमाने गावागावांत जनजागर रथाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अभियानाचा उद्देश, महत्त्व आणि कार्य समजावून सांगितले जात आहे. श्री मंगळग्रह मंदिरात वर्ष प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा तसेच भूमिमातेचा जन्मदिन या हिंदू नववर्षाच्या प्रारंभ दिनी सुरू झालेल्या अभियानास रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी एक महिना पूर्ण होत आहे. अक्षय्य तृतीया हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. जो वैशाख शुद्ध तृतीयेस साजरा होतो. याच पवित्र दिनी भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळीचा मासिक जनजागर सांगता सोहळा अतिशय भव्य-दिव्य, भक्तिमय आणि चैतन्यमय वातावरणात विधिवत करण्याचे सुनिश्चित करण्यात आले आहे. सकाळी ८.०० वाजता होणाऱ्या या पवित्र मंगल सोहळ्यास समाजातील विविध क्षेत्रांतील महानुभवांसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी शेतकऱ्यांना भूमी सुपोषण अभियानाचा उद्देश, कार्य, व्याप्ती व यांचे भविष्यातील सुपरिणाम कसे होऊ शकतात याबद्दलचा ऊहापोह केला जाणार आहे. याप्रसंगी महाराष्ट्रातील कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारीही उपस्थित राहणार आहेत.




## शेतकऱ्यांनो, एक मूठ माती घेऊन आवर्जून सहभाग नोंदवा

श्री मंगळग्रह मंदिरात अक्षय्य तृतीया अर्थात रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ मासिक जनजागरण सांगता सोहळा होणार आहे. याप्रसंगी अमळनेर तालुक्यासह परिसरातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी आपापल्या शेतातून एक मूठ माती सोबत आणावी. ही माती एकत्रित करून तिचे विधिवत पूजन आपल्या सर्वांच्या साक्षीने केले जाणार आहे. ही विधिवत अभिमंत्रित केलेली माती आपापल्या गावी परत नेवून आपापल्या शेतांत टाकावयाची आहे. ती टाकत असताना रासायनिक खाते व कीटकनाशकांचा बेसुमार वापर यापुढे कमीत कमी प्रमाणात करून शेतजमिनीची, विविध उत्पादनांची होणारी हानी टाळेल. तसेच येणाऱ्या पिढ्यांचे आरोग्य सुदृढ कसे राखले जाईल यासाठी निरंतर प्रयत्नशील राहील, असा संकल्पही आपणास करावयाचा आहे. त्यासोबतच भूमी सुपोषणाच्या या परमपवित्र कार्याचा स्वतःसह इतरांनाही जागर करण्यासाठी अभियानात सहभागी करावे, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## संपादकीय

# 'मोसमी' वारे चिंतेचे!

यंदा महाराष्ट्रासह देशाच्या प्रमुख भागांमध्ये 'एल निनो' घटक सक्रिय होण्याच्या शक्यतेमुळे सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज, हा शेतकऱ्यांसह धोरणकर्त्यांच्याही चिंतेत भर घालणारा आहे. यंदा सरासरीच्या ९२ टक्के इतकाच पाऊस होण्याचा विभागाचा प्राथमिक अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे बसलेल्या फटक्यातून बहुतांश शेतकरी अजूनही सावरलेले नाहीत. अशा काळात येणाऱ्या मॉन्सूनने पाठ फिरवण्याने पुन्हा नव्या संकटाला सामोरे जाण्याची वेळ येऊ शकते. उत्तर भारतातील मोठ्या भागांत विशेषतः गंगेचा मैदानी प्रदेश आणि पठारी भागात, तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्हे वगळता महाराष्ट्राच्या अन्य भागांमध्येही अपुरे पाऊसमान राहील, असे हा अंदाज सांगतो. मॉन्सूनच्या काळात या पावसाचे वितरण कसे राहील, म्हणजेच कोणत्या काळात आणि कोणत्या भागांत किती पाऊस होईल, याबाबत पुढील महिन्यात जाहीर होणाऱ्या अंदाजात नेमके चित्र समोर येईल. मात्र, शेतकरी आणि प्रशासनालाही संभाव्य संकटाचा मुकाबला करण्यासाठी सज्ज राहण्याचा इशारा या प्राथमिक अंदाजाने दिला आहे. आजही देशातील सुमारे ६० टक्के शेती पावसावरच अवलंबून आहे. गेल्या तीन वर्षांचा विचार करता सन २०२३ मध्ये पर्जन्यमान कमी राहिले. सन २०२४ मध्ये जास्त पाऊस झाला आणि गेल्या वर्षी तर अतिवृष्टीने शेतकऱ्यांची दाणादाण उडवून दिली. त्या पार्श्वभूमीवर यंदा पाऊस सरासरी गाठणार नाही, असा अंदाज आहे.

जून ते सप्टेंबर या मॉन्सूनच्या महिन्यांत हा घटक सक्रिय होणार आहे. पाऊस वेळेत न आल्यास दुबार पेरण्यांची वेळ येऊ शकते किंवा नंतर त्याने ओढ दिल्यास वाढीच्या काळातच पिकांना त्याचा फटका बसू शकतो. परिणामी भात, ज्वारी-बाजरी, कापूस, सोयाबीन, वेगवेगळ्या डाळी आणि तेलबियांसारख्या पिकांच्या उत्पादनात घट होऊ शकते. सध्या राज्यभरात तीव्र उन्हाळा जाणवत असून येत्या काही काळात मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेचे इशारे देण्यात आले आहेत. अशा काळात जमिनीतील ओल निघून जाते आणि जलसाठ्यांमधील पाण्याच्या बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढते. त्या पार्श्वभूमीवर पाऊसही अपुरा होणे शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरणार आहे. गेल्या वर्षी राज्याच्या अनेक भागांमध्ये अतिवृष्टीने पिके हातून गेली, तसेच जमिनींचा सुपीक थरही खरवडून गेल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये आधीच शेतकरी हैराण आहेत. त्यात अपुऱ्या पावसाने आणखी काय अडचणी उभ्या राहणार, याची नवी चिंता उभी राहिली आहे. यासाठी स्वतः शेतकरी आणि प्रशासनानेही आताच योग्य नियोजन करण्याची गरज आहे. दुष्काळ-अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तींबरोबरच मानवनिर्मित संकटांचा बळी हा शेतकरीच ठरतो, हा दैवदुर्विलास आहे. सध्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धस्थितीमुळे सारे जग होरपळत आहे. भारततही गॅसटंचाईबरोबरच इंधनाची संभाव्य टंचाई आणि खतांच्या तुटवड्याचे संकट भेडसावत आहे.

आपल्याकडे प्रामुख्याने रशिया व चीनसह सौदी अरेबिया, ओमान, कतार आणि संयुक्त अरब अमिरातींमधून खतांची आयात होते. 'होर्मुझ'च्या सामुद्रधुनीतील वाहतूक बंद असल्याने मध्यपूर्वेतून खतांचा पुरवठा विस्कळित झाला आहे, त्यावर तातडीने पर्याय शोधावा लागेल आणि खतांची भेसळ व काळा बाजारही रोखावा लागेल. त्याबरोबरच कमी पावसावर तग धरणाऱ्या पिकांचाही विचार करावा लागेल. उपलब्ध जलसाठ्यांचे योग्य नियोजन, जलसंधारण आणि पाण्याचा फेरवापर यासाठी धोरणे आखून त्याची कडक अंमलबजावणी करावी लागेल; तसेच ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचेही नवे तंत्रज्ञान वाजवी दरांत शेतकऱ्यांना पुरवावे लागेल. या युद्धस्थितीमुळे आंबे, द्राक्षे यांसह मोठ्या शेतीमालाची निर्यातही रखडल्यामुळे राज्यातील अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यातच खते-कीटनाशके आणि मजुरीच्या दरांत मोठी वाढ झाल्याने शेतमालाचा उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे; त्या तुलनेत मालाला दर मिळत नसल्याने शेती आतबट्ट्याची ठरत आहे. या मालिकेत आणखी नवे संकट शेतकरीच नव्हे, तर साऱ्या अर्थव्यवस्थेला झेपणारे नाही. गेला काही काळ नियंत्रणात असलेल्या महागाईमध्ये गेल्या महिन्यांत युद्धस्थितीने काहीशी वाढ झाली. कमी-अधिक पावसाचे निसर्गचक्र रोखता येत नसले, तरी यंत्रणा सज्ज ठेवून संकटाला सामोरे जाण्याचे नियोजन नक्कीच करता येते. सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज लक्षात घेऊन आपत्कालीन नियोजनाची आतापासूनच तयारी करायला हवी.

# काळी, गुलाबी, हिरवी कोणतीही जीन्स चालेल, पण निळी जीन्स बॅन !

## जगातल्या एकमेव देशात चालत नाही निळी जीन्स

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : जगात हा असा एकमेव देश आहे जिथे निळ्या रंगाची जीन्स घालण्यावर पूर्णपणे बंदी आहे. या देशात इतर कोणतीही जीन्स चालते, पण निळ्या जीन्सला नो एंट्री. कोणता आहे तो देश आणि का आहे असा नियम ? जीन्स... आजकाल जगभरात, बहुतांश लोकं, महिला जीन्स टॉप. जीन्स टीशर्ट घालून फिरतात. निळ्याचा रंगाची जीन्स घालणं तर खूपच कॉमन आहे. आपल्यापैकी प्रत्येकाकडे एकतरी निळी जीन्स असते. पण पण उत्तर कोरियामध्ये अशी जीन्स घालणं फार महागात पडू शकतं, तुम्ही अडचणीत सापडू शकता. खरंतर उत्तर कोरियामध्ये निळ्या जीन्स घालण्यास सक्त मनाई आहे.पण असं का ? चला जाणून घेऊया कारण..उत्तर कोरियामध्ये, ब्लू जीन्स म्हणजे फक्त एखादं कापड नव्हे तर ते अमेरिकन संस्कृती आणि भांडवलशाहीचे प्रतीक मानले जाते. हे पाश्चात्य प्रभावाचे प्रतीक आहे, असं तेथील सरकार मानतं.निळी जीन्स घालणे हा काही साधा गुन्हा नाही. या नियमाचे उल्लंघन केल्यावर पकडल्या गेलेल्या नागरिकांना मोठा दंड, सार्वजनिक शिक्षा किंवा तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. शासनाच्या नियमांचे पालन नीट होतंय ना हे पाहण्यासाठी या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी केली जाते.या देशात फॅशनवरील निर्बंध केवळ कपड्यांपुरते मर्यादित नाहीत. सरकारने केवळ काही मोजक्याच हेअर स्टाइलला मान्यता दिली आहे. महिलांसाठी अंदाजे १८ आणि पुरुषांसाठी १० हेअरस्टाइल्स आहेत. या मान्यताप्राप्त हेअरस्टाइल्समध्ये कोणताही बदल करण्यास मनाई आहे.तसेच गेल्या वर्षांत, निर्बंधांची व्याप्ती वाढली असून त्यात स्किनी जीन्स, फाटलेल्या जीन्स आणि बॉडी पिअर्सिंगवरही बंदीचा घालण्यात आली आहे, हे समाजविघातक वर्तन मानल जातं.विशेष म्हणजे, या देशात सर्वच जीन्सवर बंदी नाही. अहवालानुसार, काळ्या जीन्सला परवानगी आहे, कारण त्यांचा संबंध अमेरिकन संस्कृतीशी जोडला जात नाही.परदेशी पर्यटकांनीही या नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. स्मारक स्थळांसारख्या संवेदनशील ठिकाणी निळ्या रंगाची जीन्स घालणं हे अनादर मानलं जाऊ शकतं. ▲

# एसी बंद करताच रूम होते गरम ?

## उन्हाळ्यात रूम थंड ठेवण्यासाठी जाणून घ्या ८ टिप्स



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

उन्हाळ्यापासून बचावासाठी बहुतांश लोक घरामध्ये एसी लावतात. पण विजेच्या बिलाची चिंता देखील असते. त्यामुळे खोली थंड झाल्यानंतर काही लोक थोड्या वेळाने एसी बंद करतात. पण एसी बंद करताच काही वेळातच खोली पुन्हा गरम होऊ लागते. असे का होते ? याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या खोलीच्या भिंती, फरशी आणि फर्निचर, जे दिवसभर उष्णता शोषून घेतात. एसी बंद होताच ही उष्णता बाहेर पडू लागते आणि खोली पुन्हा तापते. पण अशा काही टिप्स आहेत की ज्याचा वापर करून आपण एसी बंद केल्यानंतरही खोली बराच काळ थंड ठेवू शकता.

**एसी बंद केल्यानंतर खोली थंड कशी ठेवावी ?**

**१) पडदे आणि ब्लाइंड्सचा योग्य वापर करा**

दिवसा सूर्यकिरणे थेट रूममध्ये येतात. ज्यामुळे खोली गरम होते. अशा वेळी रूमला उन्हापासून वाचवण्यासाठी जाड पडदे किंवा ब्लॅकआउट कर्टेन्सचा वापर करा. हे पडदे बाहेरची उष्णता आणि प्रखर ऊन आत येण्यापासून रोखतात, ज्यामुळे खोली थंड राहते.

**२) दरवाजे आणि खिडक्या बंद ठेवा**

जेव्हा एसी सुरू असेल, तेव्हा खोलीचे दरवाजे आणि खिडक्या पूर्णपणे बंद ठेवा. तसेच वारंवार खोलीबाहेर ये-जा करणे टाळा. यामुळे आतील थंड हवा बाहेर जाणार नाही आणि बाहेरची गरम हवा आत येणार नाही. परिणामी रूम जास्त वेळ थंड राहील.

**३) पंख्याचा स्मार्ट वापर करा**

एसी बंद केल्यानंतर लगेच पंखा सुरू करा. यामुळे खोलीतील साचलेली थंड हवा संपूर्ण खोलीत पसरते आणि थंडावा टिकून राहतो.

**४) भिंती आणि छत थंड ठेवा**

शक्य असल्यास घराचे छत थंड ठेवण्यासाठी 'कूल रूफ कोटिंग' किंवा पांढऱ्या रंगाचे पेंट लावा. पांढरा रंग सूर्याची उष्णता कमी शोषतो. ज्यामुळे खोली लवकर गरम होत नाही.

**५) इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वापर कमी करा**

खोलीतील टीव्ही, लॅपटॉप किंवा जास्त दिवे देखील उष्णता निर्माण करतात. त्यामुळे गरज नसेल तेव्हा या वस्तू बंद ठेवा.

**६) खोलीत रोपे ठेवा**

खोली नैसर्गिकरीत्या थंड ठेवण्यासाठी मनी प्लांट किंवा कोरफड यासारखी इनडोअर रोपे लावा. ही रोपे केवळ थंडावाच देत नाहीत, तर हवा देखील शुद्ध ठेवतात.

**७) कॉटन बेडशीट आणि हलक्या कापडाचा वापर करा**

खोलीत जड कापडाऐवजी सुती चादरी आणि वजनाने हलक्या असणाऱ्या पडद्यांचा वापर करा. सुती कापड उष्णता शोषत नाही आणि खोली थंड ठेवण्यास मदत करते.

**८) रात्रीच्या वेंटिलेशनचा फायदा घ्या**

रात्रीच्या वेळी बाहेरची हवा थंड असते. त्यामुळे रात्री खिडक्या उघड्या ठेवा जेणेकरून ताजी आणि थंड हवा खोलीत येईल. यामुळे खोलीचे तापमान संतुलित राहण्यास मदत होते.

# न मसाला, न चीनी

## गर्मी में बनाएं सत्तू का शरबत इस तरह

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



गर्मी के मौसम में चिलचिलाती धूप और उमस के बीच शरीर को हाइड्रेटेड, ठंडा और एनर्जेटिक बनाए रखना किसी चुनौती से कम नहीं है। ऐसे में उत्तर भारत का लोकल और पॉपुलर देसी प्रोटीन शेक यानी सत्तू का शरबत आपके लिए एक वरदान की तरह काम करता है। भुने हुए चनों को पीसकर तैयार किया गया यह पारंपरिक सुपरफूड न केवल स्वादिष्ट है बल्कि पोषण का पावरहाउस भी होता है।

**सत्तू के शरबत के फायदे**

शिल्पा शेट्टी से लेकर जाने-माने सेलिब्रिटी शेफ रणवीर बरार भी इसकी तारीफें कर चुके हैं और अपने यूट्यूब पर इसकी रेसिपी भी शेयर कर चुके हैं। अगर आप भी गर्मी में हर वक्त थका हुआ और डिहाइड्रेटेड महसूस करते हैं तो सत्तू का शरबत आपकी खोई हुई एनर्जी को वापस लाने का सबसे सस्ता और प्रभावी तरीका है।

**सत्तू के शरबत की रेसिपी**

- सत्तू - अपनी जरूरत के अनुसार ले सकते हैं
- ठंडा पानी १ से २ गिलास
- भुना जीरा पाउडर - आधा छोटा चम्मच
- काला नमक - स्वादानुसार
- नींबू का रस
- बारीक कटा प्याज और हरी मिर्च
- पुदीने की पत्तियां
- बनाने का तरीका

एक बड़े गिलास में सत्तू निकालें और थोड़ा सा पानी डालकर गुठलियां खत्म होने तक मिलाएं। अब बचा हुआ ठंडा पानी डालें और अच्छी तरह घोल लें। इसमें काला नमक, भुना जीरा, नींबू का रस और कटी हुई मिर्च-प्याज डालें। आप इस दौरान इसमें हल्का गुड़ मिला सकते हैं जो टेस्ट को बैलेंस करेगा। पुदीने की पत्तियों के साथ ठंडा-ठंडा सर्व करें। आप चाहें तो इसमें मिश्री या गुड़ डालकर मीठा शरबत भी बना सकते हैं।

**सत्तू के शरबत के बेमिसाल फायदे**

सत्तू की तासीर प्राकृतिक रूप से ठंडी होती है। यह भीषण गर्मी में भी शरीर के आंतरिक तापमान को संतुलित रखता है और आपको लू से बचाता है। ग्लूकोज या सॉफ्ट ड्रिंक्स के बजाय सत्तू का सेवन करें। यह आयरन, मैंगनीज और मैग्नीशियम से भरपूर होता है, जो थकान को तुरंत मिटाकर शरीर में स्फूर्ति भर देता है। फाइबर की उच्च मात्रा होने के कारण यह पाचन तंत्र को दुरुस्त रखता है. यह न केवल कब्ज की समस्या को दूर करता है, बल्कि आंतों को ठंडा रखकर एसिडिटी से भी राहत दिलाता है। सत्तू एक लो ग्लाइसेमिक इंडेक्स फूड है. इसका सेवन करने के बाद आपको जल्दी भूख नहीं लगती जिससे यह वजन घटाने की चाहत रखने वालों के लिए एक बेहतरीन मील रिप्लेसमेंट है। प्रोटीन से भरपूर और लो-शुगर होने के कारण यह मधुमेह के रोगियों के लिए एक हेल्दी ऑप्शन है।



# सूख रही तुलसी ?

## केले के छिलकों से फिर हरा होगा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अगर तुलसी की पत्तियां पीली पड़ रही हैं और पौधा सूखने लगा है, तो यह पोषक तत्वों की कमी, ज्यादा पानी या गलत देखभाल का संकेत हो सकता है। केले के छिलकों में पोटैशियम, फॉस्फोरस और कैल्शियम भरपूर होता है, जो जड़ों को मजबूत बनाता है और नई पत्तियों की ग्रोथ तेज करता है। इस्तेमाल के लिए छिलकों को पहले अच्छी तरह सुखा लें, फिर पीसकर पाउडर बना लें और इसे पानी में मिलाकर लिक्विड खाद तैयार करें। इस घोल को हफ्ते में एक बार तुलसी की जड़ों में डालें, इससे पौधे को धीरे-धीरे जरूरी पोषण मिलता रहेगा। ध्यान रखें कि गीले छिलके सीधे मिट्टी में न डालें, इससे फंगस लग सकता है और पौधा खराब हो सकता है। साथ ही तुलसी को रोज ४-५ घंटे धूप दें और तभी पानी डालें जब मिट्टी सूखी लगे। सही देखभाल और इस घरेलू उपाय से कुछ ही दिनों में तुलसी फिर से हरी-भरी और ताजगी से भरपूर नजर आने लगेगी।

# भारताचा हिरा ठरतोय इराणची आर्थिक ताकद!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

'दरिया-ए-नूर' या नावाचा हिरा तेहरान येथील सेंट्रल बँक ऑफ इराणच्या तिजोरीमध्ये नॅशनल ज्वेल्स ट्रेझरीमद्ये ठेवलेला आहे.

**वजन :** 'दरिया-ए-नूर' या हिऱ्याचं वजन १८२ कॅरेट एवढे आहे. जगातील सर्वांत मोठ्या पिंक डायमंड्सपैकी तो एक आहे.

**मुघल :** हा हिरा भारतातील गोळकोंडा खाणीतून निघालेला होता. मुघल साम्राज्याच्या खजिन्याचा अनमोल भाग ठरलेला हा हिरा आज इराणकडे आहे.

**नादिर शाह :** १७३९ मध्ये इराणचा शासक नादिर शाह याने दिल्लीवर आक्रमण केले. त्यात त्याने मयूर सिंहासन, कोहिनूर हिरा आणि 'दरिया-ए-नूर' हा हिरा लुटून नेला.

**रेझा शाह पहलवी :** १९३७ मध्ये इराणचे सर्वोच्च नेते रेझा शाह पहलवी यांनी हा हिरा सरकारी खजिना म्हणून घोषित केला.

**आर्थिक शक्ती :** आज हा हिरा केवळ एक ऐतिहासिक वस्तू नाही तर इराणच्या चलन व्यवस्थेचा आणि आर्थिक शक्तीचा एक मोठा आधार आहे.

**समुद्र :** 'दरिया-ए-नूर' म्हणजे प्रकाशाचा समुद्र. या हिऱ्याला कोहिनूरचा भाऊदेखील म्हटलं जातं. मात्र आज कोहिनूर हिरा ब्रिटिशांच्या ताब्यात आहे.

**शाही खजिना :** २० ते ५० अब्ज डॉलर्सच्या शाही खजिन्यामध्ये हा मुख्य हिरा आहे. इराणच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा हा हिरा ठरतोय.

**युद्ध :** इराणचा शाही खजिना म्हणजे युद्धाचा बॅकअप प्लॅन म्हटले तर वावगे ठरणार नाही. भारताचा हा हिरा आज इराणची ताकद बनून राहिला आहे.

# भूमी सुपोषण रथाचा झंझावात; १५६ गावांत घुमणार सेंद्रिय शेतीचा एल्गार..!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेरः वाढता रासायनिक खतांचा वापर आणि त्यामुळे खालावलेली जमिनीची सुपीकता यावर मात करण्यासाठी अमळनेर तालुक्यात भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियानाने चळवळ उभी केली आहे. आपल्या अन्नदात्या भूमीला पुन्हा एकदा सुजलाम-सुफलाम करण्यासाठी आणि शेतीला तिचे हरवलेले गतवैभव मिळवून देण्यासाठी हे अभियान आता तालुक्यातील घराघरांत पोहोचत आहे.११ एप्रिलपासून जनजागृतीची मशाल आता तालुक्याच्या कानाकोपऱ्यात प्रकाश पसरवत आहे. या अभियानांतर्गत एक विशेष जनजागर रथ तयार करण्यात आला असून, हा रथ ३ कृषी मंडळांतील तब्बल १५६ गावांना भेटी देणार आहे.गुरुवार दि.१६ ला रथाने सायंकाळच्या सत्रात हेडावे, रडावण, राजोरे, सुंदरपट्टी, सारबेटे खुर्द, सारबेटे बुद्रुक, पळासदळे आणि एकरुखी या गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला.शुक्रवार १७ ला सकाळी अमळगाव, खेडी खुर्द व सिम, जळोद, पिंपळी आणि गांधली पिळोदे या गावांमध्ये रथाचे जोरदार स्वागत करण्यात आले. श्रद्धेतून समृद्धीकडे केवळ माहिती न देता, जमिनीशी असलेले आपले नाते अधिक घट्ट करण्यासाठी या मोहिमेत आध्यात्मिक जोडही देण्यात आली आहे. गावांमध्ये अत्यंत भक्तीभावाने भूमीमाता पूजन सोहळा आयोजित केला जात आहे. सायंकाळी ५ गावांना भेटी देण्यात येणार आहे.जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे ही केवळ गरज नसून ते आपले कर्तव्य आहे, हा संदेश या पूजनाच्या माध्यमातून दिला जात आहे.रासायनिक शेतीचे मानवी आरोग्यावर आणि जमिनीवर होणारे दुष्परिणाम, तसेच जैविक (सेंद्रिय) शेतीचे दीर्घकालीन फायदे सांगणारी माहितीपत्रके प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवली जात आहेत.या मोहिमेला महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे तांत्रिक आणि मोलाचे सहकार्य लाभत आहे. अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान राबवले जात आहे.शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद तालुक्यातील शेतकरी या रथाचे ठिकठिकाणी स्वागत करत असून, सेंद्रिय शेतीकडे वळण्याचा निर्धार करत आहेत. विशेषतः तरुण शेतकऱ्यांमध्ये या अभियानाबाबत मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. या मोहिमेमुळे अमळनेर तालुका भविष्यात विषमुक्त शेती आणि समृद्ध शेतकरी या दिशेने एक आदर्श पाऊल टाकेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.








"जमिनीचा पोत सुधारणे ही आजच्या काळाची गरज आहे. जर आपली भूमाता सुदृढ असेल, तरच येणारी पिढी आरोग्यसंपन्न राहील. या मोहिमेत प्रत्येक शेतकरी बांधवाने सक्रिय सहभाग नोंदवावा.

**सुबोध पाटील,**
ग्रीनरी कन्सल्टंट, अमळनेर

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



## जागतिक वारसा दिन विशेष

# सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाबद्दलची जागरूकता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


दरवर्षी १८ एप्रिल हा दिवस 'जागतिक वारसा दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे जगभरातील सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाबद्दल जागरूकता निर्माण करणे, तसेच या अमूल्य ठेव्याचे संरक्षण करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, हा संदेश देणे होय. मानवजातीच्या इतिहासाचा, परंपरांचा आणि निसर्गाच्या अद्भुत निर्मितींचा हा वारसा केवळ भूतकाळाची आठवण नसून, तो आपल्या ओळखीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

भारतासारख्या समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेल्या देशात या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. आपल्या देशात प्राचीन मंदिरे, किल्ले, लेणी, स्मारके, तसेच जैवविविधतेने नटलेले वनक्षेत्रे आणि नैसर्गिक स्थळे यांचा मोठा ठेवा आहे. अजिंठा-एलोरा लेणी, ताजमहाल, कुतुबमिनार, किल्ले आणि विविध ऐतिहासिक वास्तू या केवळ पर्यटनस्थळे नाहीत, तर त्या आपल्या इतिहासाच्या जीवंत साक्षी आहेत. मात्र, वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि दुर्लक्ष यामुळे अनेक वारसास्थळांना धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी अतिक्रमण, भित्तीचित्रे काढणे, कचरा टाकणे यांसारख्या प्रकारांमुळे या स्थळांची हानी होत आहे. त्यामुळे वारसा जतन करण्यासाठी केवळ शासनाच्या उपाययोजना पुरेशा नाहीत, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी महत्त्वाची ठरते.

वारसा संवर्धनासाठी काही मूलभूत गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे. ऐतिहासिक स्थळांना भेट देताना स्वच्छता राखणे, नियमांचे पालन करणे, कोणतीही हानी होणार नाही याची काळजी घेणे, तसेच स्थानिक संस्कृती आणि परंपरांचा आदर करणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनीही जनजागृती मोहिमा राबवून तरुण पिढीला या कार्यात सहभागी करून घ्यावे.

डिजिटल युगात वारसा संवर्धनासाठी तंत्रज्ञानाचाही प्रभावी वापर होऊ शकतो. ३डी स्कॅनिंग, डिजिटल आर्काइव्ह, व्हर्च्युअल टूर यांसारख्या माध्यमातून आपण या वारशाचे जतन करू शकतो आणि अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवू शकतो.

जागतिक वारसा दिन हा केवळ एक औपचारिक उत्सव नसून, तो आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. आपल्या पूर्वजांनी जपलेला हा ठेवा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.



# कुशल रणनीतीज्ञ : स्वातंत्र्यवीर सेनापती तात्या टोपे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्मृतिदिन विशेष

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अग्रगण्य आणि पराक्रमी सेनानी म्हणून सेनापती तात्या टोपे यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांचा १८ एप्रिल रोजी स्मृतिदिन. यानिमित्त त्यांच्या कार्याची आणि बलिदानाची आठवण करणे म्हणजे देशभक्तीची प्रेरणा पुन्हा जागवण्यासारखे आहे. १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात त्यांनी दाखविलेले शौर्य, नेतृत्व आणि चिकाटी आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी ठरते.

तात्या टोपे यांचे मूळ नाव रामचंद्र पांडुरंग टोपे असे होते. त्यांचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला असला तरी त्यांचे विचार आणि कृती असामान्य होत्या. त्यांनी नानासाहेब पेशव्यांचे निकट सहकारी म्हणून काम करत स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. १८५७ च्या उठावात त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र लढा उभारला आणि आपल्या युद्धकौशल्याने इंग्रजांना अनेकदा चकवा दिला.

तात्या टोपे हे अत्यंत कुशल रणनितीज्ञ होते. त्यांनी छापामार पद्धतीचा प्रभावी वापर करून ब्रिटिश सैन्याला त्रास दिला. अनेक वेळा पराभवाचा सामना करावा लागला तरी त्यांनी कधीही हार मानली नाही. मध्य भारत, राजस्थान आणि उत्तर भारतातील विविध भागांत त्यांनी लढाया लढत स्वातंत्र्यलढ्याची ज्योत प्रज्वलित ठेवली.

त्यांच्या जीवनातील सर्वात मोठी वैशिष्ट्य म्हणजे संकटसमयीही त्यांनी दाखवलेली चिकाटी आणि देशासाठी असलेली निष्ठा. अखेर विश्वासघातामुळे ते ब्रिटिशांच्या ताब्यात आले आणि १८ एप्रिल १८५९ रोजी त्यांना फाशी देण्यात आली. त्यांच्या मृत्यूने स्वातंत्र्यलढ्याला एक मोठा धक्का बसला. परंतु त्यांच्या बलिदानाने पुढील पिढ्यांमध्ये स्वातंत्र्याची ज्वाला अधिक प्रखर केली.

आजच्या काळात तात्या टोपे यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ इतिहास जाणून घेणे नाही, तर त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेणे आहे. देशासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणे, संकटांना सामोरे जाण्याची तयारी ठेवणे आणि स्वाभिमानाने जगणे हे त्यांच्या जीवनातून शिकण्यासारखे धडे आहेत. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या बलिदानाचा सन्मान राखत देशप्रेमाची भावना दृढ करण्याचा संकल्प करावा.



त्यांच्या पराक्रमाची गाथा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

## स्त्रीशिक्षणाचे महान पुरस्कर्ते :

# महर्षी धोंडो केशव कर्वे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


जन्मदिन विशेष

भारतीय समाजसुधारकांच्या परंपरेत महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याची आठवण करणे म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या एका महान युगाचा सन्मान करणे होय. स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि स्त्रीस्वातंत्र्य यांसाठी त्यांनी आयुष्यभर केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे.

महर्षी कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील मुरुड येथे झाला. त्या काळात समाजात स्त्रियांना शिक्षणाची संधी नव्हती आणि विधवांचे जीवन अत्यंत हालअपेष्टांनी भरलेले होते. अशा परिस्थितीत त्यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी संघर्ष करण्याचा निर्धार केला.

कर्वे यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला आणि स्वतः विधवेशी विवाह करून समाजासमोर एक आदर्श ठेवला.

स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. १८९६ मध्ये त्यांनी 'हिंदू महिला विद्यालय' स्थापन करून स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली. पुढे त्यांनी १९१६ मध्ये 'स्नातक महिला विद्यापीठ' (आजचे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ) स्थापन केले, जे भारतातील महिलांसाठीचे पहिले विद्यापीठ ठरले. महर्षी कर्वे यांचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी समाजात स्त्री-पुरुष समानतेची जाणीव निर्माण केली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान बहाल केला.महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जन्मदिनानिमित्त आपण सर्वांनी स्त्रीशिक्षणाचा प्रसार, समानतेची जाणीव आणि सामाजिक न्याय यासाठी कार्य करण्याचा संकल्प करावा. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाज अधिक समतोल आणि प्रगत करण्यासाठी प्रयत्न करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.



# अंग्रेजी में ९८, आईटी में ९९ नंबर

## एआइ से की १० वीं की पढ़ाई; जेईई के साथ करेंगी एनडीए की तैयारी

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सीबीएसई १० वीं के नतीजों ने एक बार फिर साबित कर दिया कि अनुशासन का कोई विकल्प नहीं होता। मयूर विहार स्थित रायन इंटरनेशनल स्कूल की मेधावी छात्रा आशी राय ने ९४.२ प्रतिशत अंकों के साथ सफलता की इबारत लिखी है। आईटी में ९९ और इंग्लिश में ९८ जैसे शानदार स्कोर के साथ आशी ने न केवल अपने माता-पिता का नाम रोशन किया है, बल्कि अपनी भविष्य की राह भी स्पष्ट कर दी है।

पीसीएम और कंप्यूटर साइंस के साथ ११ वीं की पढ़ाई करने का लक्ष्य बना रहीं आशी राय कॉर्पोरेट जगत में नहीं, बल्कि देश सेवा में करियर बनाना चाहती हैं। इंजीनियरिंग और एनडीए की डुअल तैयारी के साथ वे



ऐसे करियर की तरफ कदम बढ़ा रही हैं, जहां टेक्नोलॉजी और शौर्य का गजब मेल होगा। सीबीएसई १० वीं रिजल्ट २०२६ में आशी राय ने अपनी कड़ी मेहनत और सधी हुई स्ट्रैटेजी के दम पर शानदार प्रदर्शन किया है। आशी राय के पिता सुनील राय का बिजनेस है और मां मधु राय टीसीएस में डिजाइन डायरेक्टर हैं।

**सीबीएसई १० वीं स्कोरकार्ड २०२६**

आशी राय ने बोर्ड परीक्षा में बैलेंस्ड तरीके से हर विषय में बेहतरीन अंक हासिल किए हैं। उनके स्कोरकार्ड की डिटेल नीचे चेक कर सकते हैं ।

सीबीएसई १० वीं में आशी राय की सफलता का कोई खास सीक्रेट नहीं है, बल्कि उनकी स्ट्रैटेजी रेगुलर प्रैक्टिस पर टिकी थी। उन्होंने केवल थ्योरी रटने के बजाय प्रॉब्लम सॉल्विंग पर ज्यादा फोकस किया। आशी राय अपनी कमियां पहचानने के लिए हर हफ्ते मॉक टेस्ट देती थीं। साथ ही, उन्होंने रिवीजन के लिए शॉर्ट नोट्स बनाए थे, जो परीक्षा के आखिरी दिनों में उनके लिए गेम-चेंजर साबित हुए।

**पढ़ाई में तकनीक का साथ : एआय बना स्मार्ट टूल**

आज के दौर में जहां स्टूडेंट्स टेक्नोलॉजी के कारण पढ़ाई से भटक जाते हैं, वहीं आशी ने एआय (आर्टिफिशियल इंटेलिजेंस) को अपना 'स्मार्ट लर्निंग टूल' बनाया। उन्होंने इसे शॉर्टकट के रूप में नहीं, बल्कि कॉन्सेप्ट्स को मजबूत करने और डाउट्स क्लियर करने के लिए इस्तेमाल किया। एआई की मदद से वे अलग-अलग तरह के सवालों का अभ्यास कर पाईं और अपने कमजोर क्षेत्रों की पहचान कर उन्हें बेहतर बनाया।

**इंजीनियरिंग और डिफेंस का मेल है सपना**


आशी राय ने ११ वीं कक्षा के लिए पीसीएम (फिजिक्स, केमिस्ट्री और मैथ) के साथ सीएस (कंप्यूटर साइंस) स्ट्रीम को चुना है। उनका भविष्य का रोडमैप बिल्कुल साफ है- वे इंजीनियरिंग की पढ़ाई करना चाहती हैं लेकिन उनका असली जुनून देश सेवा में है। आशी राय जेईई के साथ-साथ एनडीए की तैयारी करने की योजना बना रही हैं। वह आगे चलकर एएफसीएटी और सीडीएस जैसी परीक्षाओं के जरिए भारतीय वायु सेना या थल सेना में करियर बनाना चाहती हैं।

# जगातील सर्वांत लांब रस्ता कोणता?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगातील सर्वांत लांब रस्ता कोणता आहे? कुठून कुठेपर्यंत जातो. यासंदर्भातील माहिती जाणून घ्या.

पॅन-अमेरिकन हायवे हा जगातील सर्वांत लांब रस्ता आहे. तो अलास्काच्या प्रुधो बेपासून अर्जेंटिनाच्या उशुआयापर्यंत जातो. पॅन-अमेरिकन महामार्ग साधा नाही. तो तब्बल ३० हजार किलोमीटर लांब पसरलेला अवाढव्य जागतिक रस्ता आहे.हा रस्ता अमेरिका, कॅनडा, मेक्सिकोपासून अर्जेंटिनापर्यंत १४ देशांना जोडणारे जागतिक महामार्गाचे अद्भुत जाळे आहे.



रोड ट्रिप प्रेमींसाठी पॅन-अमेरिकन हायवे स्वप्नासारखा असला, तरी अनेक अडथळे आणि आव्हानेही येथे वाट पाहत असतात.

पॅन-अमेरिकन हायवेवर दरड कोसळणे, पूर येणे आणि इतर नैसर्गिक संकटांचा धोका सतत संभवतो. त्यामुळे प्रवास काळजीपूर्वक करावा. या महामार्गावरून पूर्ण प्रवास करायचा झाल्यास व्यक्तीला एक महिना ते तब्बल एक वर्षही लागू शकते. पॅन-अमेरिकन महामार्गानंतर आशियाई महामार्ग १ (एएच १) हा जगातील दुसरा सर्वांत लांब रस्ता असून तो २०, ५५७ किलोमीटरचा आहे.

# सापाचे बीळ आहे की उंदराचे हे कसे ओळखाल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

## दोन्हींमधील नेमका फरक काय? जाणून घ्या

उन्हाळा सुरू झाला की बागेत छोटे-मोठे खड्डे दिसू लागतात. हे पाहताच अनेकांच्या मनात विचार येतो की, हे सापाचे बीळ तर नाही ना? सापाचे बीळ कसे ओळखायचे ते जाणून घेऊया.

घराच्या अंगणात जर बाग असेल तर त्यात अनेकजण वेगवेगळी झाडे लावतात. या बागेची निगा राखणे खूप गरजेचे असते. या बागेची देखभाल करणे, पाणी देणे, छाटणी करणे हा त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनतो. मात्र, उन्हाळा सुरू झाला की बागेत छोटे-मोठे खड्डे दिसू लागतात. हे पाहताच अनेकांच्या मनात विचार येतो, की हे सापाचे बीळ तर नाही ना? मात्र प्रत्येक बीळ हे सापाचेच असते असे नाही. ते उंदीर किंवा इतर प्राण्यांचे



असू शकते. आज आपण सापाचे बीळ कसे ओळखायचे ते जाणून घेऊया.

तज्ज्ञांच्या मते सापांना पंजे नसतात. त्यामुळे ते स्वतः बीळ किंवा खड्डे खोदू शकत नाहीत. ते नेहमी तयार असलेल्या बिळांचा वापर करतात. बहुतेक वेळा ते उंदीर, खार किंवा इतर लहान प्राण्यांनी बनवलेल्या जुन्या बिळांमध्ये राहतात.

**बिळाचा आकार आणि रचना**

सापाचे बीळ साधारणतः गोल आणि नीट दिसते, तर उंदराचे बीळ थोडे ओबड-खाबड असू शकते. उंदराच्या बिळाचा व्यास साधारण १ ते ३ इंचांदरम्यान असतो. जर बीळ खूप मोठे असेल, तर तेथे एखादा मोठा साप असण्याची शक्यता असते. तर उंदराच्या बिळाजवळ दातांनी कुरतडल्याचे चिन्ह किंवा लहान पायवाटा दिसू शकतात. मात्र सापाच्या बिळाजवळ अशी चिन्हे नसतात.

**मातीच्या ढिगाऱ्यावरून असे ओळखा**

उंदीर किंवा खार बीळ खोदताना माती बाहेर फेकतात. त्यामुळे बिळाभोवती मातीचा छोटा ढिगारा तयार होतो. पण साप माती खोदत नाहीत. त्यामुळे बिळाभोवती मातीचा ढिगारा नसेल तर तिथे साप असण्याची शक्यता जास्त असू शकते.

**बिळाजवळील चिन्हे**

बिळाजवळ साप असल्याचा सर्वांत मोठा पुरावा म्हणजे त्याने टाकलेली कात आणि त्याची विष्ठा. सापाची विष्ठा गडद रंगाची असते आणि त्यात हाडांचे किंवा केसांचे अंश असू शकतात. मात्र या ठिकाणी उंदीर असेल तर तिथे गवताचे तुकडे, बियांचे कवच किंवा त्यांची लहान विष्ठा दिसू शकते.

**कोळ्याची जाळी**


जर एखाद्या बिळाच्या तोंडाशी कोळ्याचे जाळे किंवा सुकलेली पाने असतील, तर ते बिळ बऱ्याच काळापासून रिकामे असण्याची शक्यता आहे. पण जर बिळ स्वच्छ आणि गुळगुळीत दिसत असेल, तर तिथे एखाद्या प्राण्याची सतत ये-जा करत असतो. जर ते सापाचे बीळ असेल, तर साप रांगत असल्यामुळे आसपासची माती सपाट आणि दाबलेली दिसू शकते. या सोप्या फरकांद्वारे तुम्ही सापाचे बीळ ओळखू शकता.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे



# सोने-चांदी खरेदीसाठी 'हा' दिवस ठरणार महाशुभ

## १९ एप्रिलला बनत आहेत खास योग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संस्कृतीमध्ये सोने आणि चांदीची खरेदी करणे हे केवळ फॅशन नसून ती एक सुरक्षित गुंतवणूक आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. ज्योतिषशास्त्रीय गणनेनुसार १९ एप्रिल २०२६ हा दिवस सोने-चांदी खरेदीसाठी अत्यंत विशेष आणि 'महाशुभ' ठरणार आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये सोने आणि चांदीची खरेदी करणे हे केवळ फॅशन नसून ती एक सुरक्षित गुंतवणूक आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. ज्योतिषशास्त्रीय गणनेनुसार १९ एप्रिल २०२६ हा दिवस सोने-चांदी खरेदीसाठी अत्यंत विशेष आणि 'महाशुभ' ठरणार आहे. या दिवशी ग्रहांच्या अशा काही स्थिती निर्माण होत आहेत, ज्या केवळ संपत्तीत वाढ करणार नाहीत, तर तुमच्या घरात स्थिर लक्ष्मीचा वास निर्माण करतील.

**धन-वृद्धी योगाचा प्रभाव**

१९ एप्रिल रोजी नक्षत्र आणि तिथीच्या संयोगामुळे 'रवी योग' आणि 'अमृत सिद्धी योग' तयार होत आहेत. ज्योतिषशास्त्रानुसार या योगात केलेली कोणतीही गुंतवणूक, विशेषतः सुवर्ण खरेदी, भविष्यात कित्येक पटीने वाढते. या दिवशी खरेदी केलेले सोने घरातील नकारात्मकता दूर करून आर्थिक स्थैर्य देते. याच दिवशी अक्षय्य तृतीय असल्याने याचे महत्त्व आणखी वाढते.

**अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर मोठी संधी**

एप्रिलमध्ये येणाऱ्या अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर हा खरेदीचा सर्वांत मोठा मुहूर्त मानला जात आहे. ज्यांना अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर खरेदी करायची आहे. त्यांच्यासाठी हा दिवस खऱ्या अर्थाने 'गोल्डन चान्स' आहे. या दिवशी सोने खरेदी केल्याने ते 'अक्षय' राहते, अशी मान्यता आहे.

**गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम वेळ**

सध्याच्या जागतिक बाजारपेठेतील चढ-उतार पाहता तज्ज्ञांच्या मते या दिवशी सोन्यात केलेली गुंतवणूक दीर्घकालीन नफा मिळवून देणारी ठरेल. केवळ दागिनेच नाही, तर सोन्याची नाणी किंवा 'गोल्ड ईटीएफ'मध्ये गुंतवणूक करण्यासाठी हा मुहूर्त अत्यंत लाभदायक आहे.

**कौटुंबिक आणि मंगल कार्यासाठी शुभ**

जर तुमच्या घरात लवकरच लग्नकार्य किंवा इतर मंगल समारंभ असतील, तर दागिन्यांची खरेदी करण्यासाठी हा दिवस निवडावा. या शुभ मुहूर्तावर घेतलेले दागिने कुटुंबात सुख आणि शांती घेऊन येतात.

**चांदी खरेदीचे महत्त्व**

केवळ सोनेच नव्हे, तर चांदी खरेदी करणेही या दिवशी तितकेच फलदायी ठरेल. चांदीला चंद्राचे प्रतीक मानले जाते. या दिवशी चांदीची भांडी किंवा मूर्ती खरेदी केल्याने मनाला शांती लाभते आणि घरातील सदस्यांचे आरोग्य उत्तम राहते.

**राशीनुसार खरेदीचा लाभ**

या दिवशी विशेषतः वृषभ, सिंह, तूळ आणि धनु राशींच्या जातकांसाठी सोने खरेदी करणे अत्यंत भाग्यशाली ठरेल. इतर राशींच्या जातकांनीही त्यांच्या शुभ मुहूर्तावर छोटीशी सुवर्ण किंवा रौप्य वस्तू खरेदी केल्यास धन-धान्यात वृद्धी होईल.

# अक्षय्य तृतीयाला बनवा आजी, पणजीच्या काळातील गव्हाची सांजोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अक्षय्य तृतीया, गुढीपाडवा किंवा गणेशोत्सव यांसारख्या सणांमध्ये आपल्या घराघरांत पारंपरिक पदार्थांची रेलचेल असते. आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक जुने, पारंपरिक पदार्थ विस्मृतीत जात आहेत. अशाच विसरलेल्या पण अत्यंत चविष्ट आणि खमंग पदार्थांपैकी एक म्हणजे 'गव्हाची सांजोरी' किंवा 'रवा सांजोरी'. आजी, पणजीच्या काळात खास सणांसाठी बनवली जाणारी ही रेसिपी आता फारशी दिसत नाही. मात्र तिची चव, कुरकुरीत पोत आणि पौष्टिकता यामुळे ती पुन्हा आपल्या स्वयंपाकघरात स्थान मिळवण्यास पात्र आहे. सांजोरी हा प्रकार दिसायला पुरीसारखा असला तरी त्यामध्ये गोड सारण भरलेले असते. बाहेरून खुसखुशीत आणि आतून मऊसर, गोड आणि सुगंधी अशी ही डिश प्रत्येक घासात आनंद देते. विशेष म्हणजे ही रेसिपी टिकाऊ आहे आणि ५-६ दिवस सहज खराब होत नाही. त्यामुळे सणांसाठी अगदी योग्य आहे.

पूर्वीच्या काळात प्रत्येक सणाला ठराविक पदार्थ बनवण्याची परंपरा होती. त्यामागे ऋतू, आरोग्य आणि उपलब्ध साहित्य यांचा सुंदर संगम असायचा. सांजोरी ही देखील तशीच एक बुद्धिमान रेसिपी आहे. रवा, गूळ, तूप यांसारख्या पदार्थांचा वापर केल्यामुळे ती पौष्टिक आणि उर्जादायी बनते. गुळामुळे शरीराला उष्णता मिळते, तर रवा पचायला हलका असतो. त्यामुळे उन्हाळ्यातील अक्षय तृतीयेच्या सणासाठी हा पदार्थ अगदी योग्य ठरतो.



**सांजोरीची खासियत**

सांजोरीची सर्वात मोठी खासियत म्हणजे तिचा पोत. बाहेरून कुरकुरीत आणि आतून मऊसर गोड सारण हे तिचं वैशिष्ट्य आहे. तळताना ती फुलते आणि सुंदर दिसते. तसेच, तिचा सुगंधही अतिशय मोहक असतो वेलची, जायफळ आणि गुळाचा एकत्रित सुवास संपूर्ण घरात दरवळतो.

चांगली सांजोरी बनवण्यासाठी साहित्याची निवड अत्यंत महत्त्वाची आहे. बारीक रवा वापरल्यास सारण छान एकजीव होते. गूळ ताजा आणि मऊ असावा, म्हणजे तो सहज वितळतो. तूप शुद्ध आणि सुगंधी असणे गरजेचे आहे. खसखस आणि साय यामुळे सारण अधिक श्रीमंत आणि चविष्ट बनते.

सर्वप्रथम बारीक रवा तुपात मंद आचेवर खमंग भाजून घ्यावा. रव्याचा रंग किंचित सोनेरी झाला आणि त्यातून छान वास येऊ लागला की तो तयार झाला असे समजावे. त्यानंतर त्यात किसलेला गूळ घालून नीट परतावे. गूळ वितळल्यानंतर त्यात वेलची पूड, जायफळ पूड, खसखस आणि साय घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत परतावे. हे सारण थंड होऊ द्यावे.

गव्हाचे पीठ घेऊन त्यात थोडे तूप किंवा तेलाचे मोहन आणि चिमूटभर मीठ घालावे. नंतर पाणी घालून पुरीसारखी घट्ट कणीक मळावी. ही कणीक 10-15 मिनिटे झाकून ठेवल्याने ती मऊ आणि लवचिक होते.

कणकेचे छोटे गोळे करून त्यांची पुरी लाटावी. त्या पुरीमध्ये रव्याचे सारण भरून कडा नीट बंद कराव्यात. त्यानंतर हलक्या हाताने पुन्हा लाटून घ्यावे. खूप पातळ लाटू नये, नाहीतर तळताना फाटण्याची शक्यता असते.

कढईत तेल मध्यम गरम करून सांजोरी मंद आचेवर तळावी. दोन्ही बाजूंनी सोनेरी रंग येईपर्यंत तळल्यावर ती तयार होते. तळताना घाई करू नये, कारण मंद आचेवर तळल्याने ती अधिक कुरकुरीत होते.

सांजोरी अधिक कुरकुरीत आणि कमी तेलकट हवी असेल, तर तळण्यापूर्वी तव्यावर हलकी भाजून घ्यावी. त्यामुळे तिचा पोत अधिक छान येतो. तसेच, तळल्यानंतर ती पूर्ण थंड झाल्यावरच खाण्यासाठी वापरावी कारण थंड झाल्यावर ती अधिक खुसखुशीत लागते.

सांजोरी ही फक्त चविष्ट नाही, तर पौष्टिक देखील आहे. गव्हाचे पीठ फायबरयुक्त आहे, रवा ऊर्जा देतो, गूळ आयर्नचा उत्तम स्रोत आहे आणि तूप शरीराला आवश्यक फॅट्स पुरवते. त्यामुळे सणाच्या दिवशी गोड खाण्याचा आनंद घेतानाच आरोग्याचीही काळजी घेतली जाते.

# चैत्रातील अमावास्येस दानाला विशेष महत्त्व

## सूर्य-चंद्र युतीमुळे 'या' वस्तू दान केल्यास लाभते पुण्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चैत्र अमावस्येच्या दिवशी दानाला विशेष महत्त्व आहे. १७ एप्रिल २०२६ रोजी अमावास्येच्या दिवशी पितृदोषातून मुक्ती मिळविण्यासाठी आणि इतर समस्यांमधून सुटका मिळविण्यासाठी अनेकांकडून काही गोष्टींचे दान केले गेले.



हिंदू वर्षातील ही पहिलीच अमावस्या होती. ज्योतिषशास्त्रानुसार अमावास्येच्या दिवशी सूर्य आणि चंद्र एकाच राशीत एकत्र येत असल्याने एक अत्यंत दुर्मिळ शुभ योग निर्माण होतो. हा काळ पितृदोषातून मुक्ती मिळविण्यासाठी आणि रखडलेली कामे मार्गी लावण्यासाठी अत्यंत प्रभावशाली मानला जातो. तसेच या दिवशी केलेले दान महत्वपूर्ण मानले जाते.

**अन्नदान**

अमावास्येच्या दिवशी गरिबांना किंवा गरजू व्यक्तींना सात्त्विक अन्नाचे दान करणे अत्यंत पुण्यकारक मानले जाते. या दिवशीच्या सूर्य-चंद्र युतीमुळे अन्नाचे दान केल्यास घरातील अन्नाची कमतरता दूर होते आणि पितरांचा आशीर्वाद लाभतो. विशेषतः खिचडी किंवा पांढऱ्या अन्नाचे दान करणे फलदायी ठरते.

**काळ्या तिळाचे दान**

शनीची साडेसाती किंवा पितृदोषाचा त्रास असलेल्या लोकांसाठी काळ्या तिळाचे दान करणे हा रामबाण उपाय आहे. चैत्र अमावास्येच्या योगावर काळे तीळ दान केल्याने प्रलंबित असलेली कायदेशीर कामे किंवा सरकारी अडथळे दूर होण्यास मदत होते.

पाणी आणि रसाळ फळे

सध्या उन्हाळ्याचा काळ असल्याने तहानलेल्यांना पाणी पाजणे किंवा कलिंगड, खरबूज यांसारख्या रसाळ फळांचे दान करणे अत्यंत शुभ मानले जाते. या दानामुळे कुंडलीतील चंद्र दोष दूर होतो आणि मानसिक शांती लाभते.

**वस्त्रदान**

जर कामात सतत अडथळे येत असतील, तर गरिबांना वस्त्रांचे दान करावे. साडेसाती सुरू असलेल्यांनी काळे वस्त्र आणि मानसिक तणाव असलेल्यांनी पांढऱ्या वस्त्राचे दान करावे. यामुळे ग्रहांची वक्रदृष्टी सौम्य होते.

**गूळ आणि तूप**

सूर्य-चंद्राच्या युतीचा सकारात्मक परिणाम मिळविण्यासाठी गूळ आणि शुद्ध तुपाचे दान करावे. गुळामुळे सूर्याचे बळ वाढते. ज्यामुळे समाजात मान-सन्मान मिळतो, तर तुपामुळे आरोग्याच्या तक्रारी दूर होऊन आयुष्यात स्थैर्य येते.

**दीपदान**

अमावास्येच्या रात्री पिंपळाच्या झाडाखाली किंवा घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर तिळाच्या तेलाचा दिवा लावणे किंवा मंदिरात दिव्यासाठी तेल दान करणे अत्यंत प्रभावी ठरते. यामुळे आयुष्यातील अंधार दूर होऊन प्रगतीचा प्रकाश मिळतो.

# अक्षय्य तृतीया : एक दृष्टिक्षेप

रणरणत्या उन्हात पोळून निघालेली धरणी, माळरानावर गवताच्या शोधात वणवण भटकणारी गुरे, उन्हाने बेजार झालेले विहंग, दुपारच्या वेळी सुनेसुने वाटणारे रस्ते, मध्येच अंगाची काहिली करणारा उनाड उष्ण वारा अंगलट करतो आणि त्यातच मनाला धुंद करणारा आमराईतून उमटणारा कोकीळ स्वर. हा सारा विरोधाभास मात्र अक्षय्य तृतीयेच्या (आखाजीच्या) सणाच्या चाहुलीने दिलासा देतो.

वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच अक्षय्य तृतीया. या दिवसाला हे नाव पडण्याचे कारण श्रीकृष्णाने धर्मराजाला सांगितलेले आहे, की या दिवशी केलेले दान, हवने क्षयाला जात नाहीत म्हणून मुनींनी या दिवसाला अक्षय्य तृतीया म्हटलेले आहे. चैत्र शुद्ध तृतीयेला चैत्र गौर बसविली जाते. त्यानिमित्त चैत्राचे हळदी-कुंकू समारंभ घरोघर करण्याची प्रथा आहे. एक महिन्यानंतर या गौरीच्या उत्सवाची अक्षय्य तृतीयेला समाप्ती होते. या हळदी-कुंकवात स्त्रियांना कच्ची कैरी घालून केलेली डाळ आणि पन्हे देण्याची पद्धत आहे. ओल्या हरभऱ्यांनी स्त्रियांची ओटी भरतात. यामागे ऋतूतील महत्त्वाचे फळ आंबा, त्याचे पूर्वरूप कच्ची कैरी, त्याचा वापर केला जावा हा हेतू आहे. याचे कारण आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. उन्हाळा वाढल्याने घामावाटे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असते. कच्च्या कैरीमधे आम्लता आणि क्षार यांचे प्रमाण जास्त असते. कैरीचे पाणी आणि त्यात गूळ घालून पन्हे केले की ते पोटात जाते व आरोग्यवर्धक ठरते.



हरभराडाळीमधे प्रथिनांचे प्रमाण जास्त असते. त्यामध्ये कच्ची कैरी घालून केलेली डाळ खाल्ली तर पाणी आणि क्षार यांचा समतोल टिकून राहतो. त्यामळे त्वचेचे कार्य आणि रक्ताभिसरण सुरळीत चालते. अक्षय्य तृतीयेला सुवासिनी हळदी-कुंकू करतात. पूर्वी स्त्रियांचा वावर समाजात फार कमी होता. त्यांना एकत्र येऊन आनंद घेता यावा हा हेतू होता. अक्षय्य तृतीयेच्या हळदी-कुंकवाने महिनाभर चालणाऱ्या गौरीच्या उत्सवाची समाप्ती होते.

स्त्रियांसाठी हा सण म्हणजे आनंदाची पर्वणीच असते. सासुरवाशिणींच्या उत्साहाला उधाण येते. त्या माहेरी जायची स्वप्ने पाहू लागतात आणि आपोआपच त्यांच्या ओठांवर शब्द उमटतात-

**"माहेरनी वाट, वाट वाटे व सोनानी**
**आखाजीले भेट व्हई मनी माय काशीनी**
**आखाजीना सण, वाट धरू माहेरनी**
**सोनानी दहेली मना भाऊ भासासनी"**

सोन्याचा उंबरठा असलेल्या भावाच्या घरी जाण्यासाठी सासुरवाशीण आसुसलेली असते. आईला आपल्या लेकीला भेटण्याची उत्कंठा असते. मुलीच्या आठवणीने तिचे डोळे पाणावतात आणि अश्रू शब्दरूप घेतात-

**"गया गुढीपाडा, उना आखाजीना सण**
**लेक सासरवाशी, माय काशीले रडू उनं"**
**आखाजी सणले टिपऱ्या आणू मी सागऱ्या**
**लेकी मन्या सकवार, जशा पुतया सोनान्या"**

असे ओव्यांमधून प्रेम प्रकट होते. झाडाला झोके बांधतात. झोक्यावर बसून आखाजीची गाणी गाण्यात आणि ऐकताना खूप मजा येते. "एवढीशी गौराई ठुमकडी माय ठुमकडी", "आथानी कैरी तथानी कैरी, कैरी झोका खाय वं" ही गाणी नात्यांमध्ये प्रेम आणि ओलावा जीवंत ठेवणारी आहेत.

असा हा नात्यांची वीण घट्ट करणारा सण म्हणजे अक्षय्य तृतीया. घराघरांत हर्षाची बरसात करणारा हा सण दरवर्षी नवा उत्साह घेऊन येतो. या आनंदोत्सवात व्यापारी, कारखानदार आपल्या नवीन कामांचा शुभारंभ साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या अक्षय्य तृतीयेला करतात. सालदारांचे नवीन साल ठरते. त्यांच्याही नववर्षाला सुरूवात होते. शेतीकामांनाही अक्षय्य तृतीयेनंतर वेग येतो. वर्षा ऋतूची चाहूल लागते. निरभ्र, निळ्या आकाशात तुरळक ढग दिसू लागतात. त्राही-त्राही करणारी सजीवसृष्टी मलूल होऊन पावसाच्या आगमनाची वाट पाहते. अशा प्रकारे दरवर्षी अक्षय्य तृतीया येते, सृष्टीत बदल होतच असतात. परंतु या संगणकाच्या युगात दिवसेंदिवस सणांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असून, सणांचे महत्त्व कमी होत असल्याचे जाणवते. काही प्रथा कालौघात लुप्त होऊ पाहत आहेत. पण आपल्या खानदेशच्या सांस्कृतिक वारशांचे जतन आणि संवर्धन करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.

**- सौ. वसुंधराताई लांडगे**
**गायन विशारद, अमळनेर.**

## अमळनेरचा यात्रोत्सव

# भक्ती, मनोरंजन आणि जिव्हाळ्याचा संगम !

अमळनेरची ऐतिहासिक आणि आध्यात्मिक यात्रा म्हणजे खानदेशच्या सांस्कृतिक वैभवाचा एक सुवर्णकणच आहे. या यात्रेचे स्वरूप, परंपरा आणि उत्साह शब्दबद्ध सहज शक्य होणारे नाही इतके पैलू या यात्रोत्सवाला आहेत.





संत सखाराम महाराज यांचा यात्रोत्सव असलेली ही यात्रा भक्ती, आनंद आणि परंपरेचा वाळवंटातील सोहळाच आहे. म्हणून महाराष्ट्रातील यात्रांच्या परंपरेत अमळनेरच्या यात्रेचे स्थान अढळ आहे. रणरणत्या उन्हात, बोरी नदीच्या विस्तीर्ण पात्रात (वाळवंटात) भरणारी ही यात्रा केवळ एक बाजार नसून, तो भक्ती, मनोरंजन आणि कौटुंबिक जिव्हाळ्याचा त्रिवेणी संगम आहे. हिवाळ्यापासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्रातील यात्रांचा समारोप अमळनेरच्या या यात्रेने होतो. कारण यानंतर पावसाळ्याची चाहूल लागते.

मोठा आध्यात्मिक वारसा आणि इतिहास देखील या यात्रेस आहे. या यात्रेचा केंद्रबिंदू म्हणजे संत सखाराम महाराज. विठूमाऊलींचे परमभक्त असलेल्या महाराजांच्या स्मतिप्रीत्यर्थ ही यात्रा भरते. पंढरीच्या वारीला जाण्यापूर्वी तत्कालीन सखाराम महाराज आपल्या कुटीला अग्नी लावून मार्गस्थ होत असत, या त्यागाची आणि भक्तीची आठवण आजही या सोहळ्यात जपली जाते.

अक्षय्य तृतीयेला नदीपात्रातील समाधीसमोर स्तंभारोपणाने यात्रेचा श्रीगणेशा होतो. पंढरपूरच्या विठोबाचे प्रतिनिधी म्हणून बेलापूरकर महाराजांचे आगमन हा या यात्रेचा सर्वांत महत्त्वाचा क्षण. त्यांचे स्वागत करण्यासाठी गादीपती प्रसाद महाराज आणि अमळनेरकर भाविक वेशीपर्यंत जातात. येथून पुढे कीर्तन, प्रवचन आणि हरिपाठाची एक आध्यात्मिक मेजवानीच रसिकांना मिळते.

मनोवेधक असा रथोत्सव आणि सोहळा अनुभवताना आनंदाला उधाण येते. एकादशीच्या पहाटे वाडी चौकातील मंदिरातून निघालेला, लालजींच्या मूर्तीने सजलेला भव्य रथ सराफ बाजार आणि फरशी पुलावरून मार्गस्थ होतो तेव्हा अवघी नगरी विठ्ठलमय होते. रथ फरशी पुलावर आल्यावर रंगबिरंगी फटाके, रॉकेट यांची आतषबाजी नयनरम्य असते. यानंतर वैशाख शुद्ध पौर्णिमेस पालखी निघते. पहाटे पाचच्या सुमारास वाडी संस्थानातून निघालेली पालखी दुपारी चारच्या सुमारास जागेवर येते. पालखीच्या दुसऱ्या दिवशी गोपाळकाल्याच्या कीर्तनाने यात्रेची मुख्य सांगता होते.

**- धनंजय सोनार,**
**सामाजिक कार्यकर्ते, अमळनेर.**

### यात्रेतील खाद्याची मेजवानी अवर्णनीय

यात्रेच्या खाऊमध्ये गुळाच्या जिलेबीचा दरवळ सर्वत्र असतोच. पण अमळनेरच्या यात्रेचे खरे वैशिष्ट्य म्हणजे टरबूज. उन्हाचा तडाखा कमी करणारे, आरोग्यास हितकारक आणि खिशाला परवडणारे हे 'काळीशार पाठ' असलेले टरबूज संपूर्ण कुटुंब मिळून तृप्तीचा ढेकर येईपर्यंत खातात. रात्रीच्या वेळी वाळवंटात कोणतेही अंथरूण न टाकता केवळ निसर्गाच्या कुशीत लागणारी 'समाधी'सारखी झोप ही या यात्रेची खास अनुभूती आहे. रथोत्सव आटोपल्यानंतर चार-पाच दिवसांनंतरच्या यात्रेस गमतीने 'बाशी यात्रा' म्हणतात. मुख्य सोहळा संपल्यानंतर सुरू होते ती 'बाशी यात्रा'. उशिरा आलेले पाहुणे आणि स्थानिक नागरिक घरून आणलेल्या दशम्या, ठेचा, भाकरी आणि खिचडीचा डबा नदीपात्रात बसून आनंदाने खातात. सुरक्षेच्या कारणास्तव आता वेळेची मर्यादा असली, तरी पूर्वी पहाटे चारपर्यंत चालणारी ही यात्रा आजही तितकीच चैतन्यमय आहे.

### व्यापार आणि मनोरंजनाची सुंदर सांगड

यात्रेत केवळ खेळणीच नव्हे, तर पोळपाट-लाटणे, चाटू, गाळणी यांसारख्या घरगुती वस्तूंचीही मोठी उलाढाल होते. आकाशात झेपावणारे पाळणे, 'मौत का कुवा' आणि नावीन्यपूर्ण वस्तूंची दुकाने यांनी नदीपात्र दोन्ही तीरांपर्यंत गजबजलेले असते. नोकरी-व्यवसायानिमित्त बाहेर असलेले अमळनेरकर आवर्जून घरी परततात. ज्यामुळे या यात्रेला एका मोठ्या कौटुंबिक संमेलनाचे स्वरूप प्राप्त होते. थोडक्यात सांगायचे तर अमळनेरची यात्रा म्हणजे सर्वधर्मीयांच्या एकतेचे, परंपरेच्या अभिमानाचे आणि कडक उन्हाळ्यात मनाला शांती देणारे एक आनंदी पर्व आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)